वागळे वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस. मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in



जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/७७८ /२०२६ दि. 03 /०९/२०२६

–: वाहतूक नियंत्रण अधिसुचना :–

ज्याअर्थी, वागळे वाहतूक उप विभागाचे हद्दीत दिनांक ०५/०९/२०२६ रोजी श्री. साईश्रध्दा सेवा समिती, साईबाबा रोड, रामचंद्रनगर नं.३, वागळे ईस्टेट, ठाणे प.यांच्या कडुन रोड नं.३३ रामचंद्र नगर नं.३ नाका वागळे ईस्टेट येथे **'दहीहंडी'** हा कार्यक्रम असुन सदर कार्यक्रमा करीता मोठया प्रमाणात व्हि.आय.पी., गोविंदा पथके तसेच नागरीक उपस्थित राहतात. त्यामुळे सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

प्रवेश बंद – १) कामगार नाक्याकडुन नितिन जंक्शनकडे येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **रामचंद्रनगर नं.३ नाका** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

पर्यायी मार्ग – कामगार नाक्याकडुन येणारी सर्व वाहने ही समतानगर कट येथून डावीकडे वळुन पुढे जैन ट्रेडर्स कट येथून डावीकडे वळुन पुढे इच्छित स्थळी जातील.

प्रवेश बंद – २) कॅडबरी जंक्शनकडुन व वर्तकनगर कडुन समातानगर मार्गे कामगार नाक्याकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **रेमंड कंपनी येथील सारास्वत बॅक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

पर्यायी मार्ग – सदरची सर्व प्रकारची वाहने हि कॅडबरी जंक्शनकडुन नितिन जंक्शन येथुन उजवीकडे वळुन पुढे इच्छीत स्थळी जातील.

नो पार्कींग – रोड नं.३३ वर नितन जंक्शन ते ज्ञानेश्वरनगर पर्यत दोन्ही बाजुस सर्व प्रकारच्या वाहनांना **नो पार्कींग** करण्यात येत आहे.

सदरची अधिसुचना दि. ०५/०९/२०२६ रोजी सकाळी ०८:०० वा. पासुन ते रात्रौ २३.४५ वाजे पावेतो अंमलात राहील.

सदरची अधिसुचना फायर ब्रिगेड, रूग्णवाहिका, पोलीस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

(पंकज शिरसाट)
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

प्रत माहितीसाठी सादर

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी,ठाणे.
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका,ठाणे.
मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–१, ठाणे, परिमंडळ–५ वागळे इस्टेट व विशेष शाखा, ठाणे

प्रत कार्यवाहीसाठी :–

प्रादेशिक परिवहन अधिकारी ठाणे.

परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे, बृहन्मंबई व वसई–विरार महानगरपालिका.

नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे

विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे

प्रत :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर

२/– सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे

२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत :– संबंधित सपोआ वाहतूक विभाग व वाहतूक उप विभाग ठाणे शहर.